International Research Fellow Association

RESEARCH WORK

December - 2017

E-ISSN: 2321-4953

# IRFA's UNIRESEARCH

## Multidisciplinary International E-Research Journal

Vol. - IX Issue - VI

*Indexed in DRJI & Indian Citation Index*

*UGC Approved List No. 63005*

*Double Blind Peer Reviewed Journal*

*Cosmos Impact Factor - 3.020 [2015]*

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all

Home About Us Organization Commission Universities Colleges Publications

UGC Approved List of Journals

You searched for unireseach

Total Journals : 1

|| Home ||

Show 25 entries

Search:

| View | Sl.No. | Journal No | Title | Publisher | ISSN | E-ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 63005 | Uniresearch- Multidisciplinary International E-Research Journal | International Research Fellows Association | | 23214953 |

Showing 1 to 1 of 1 entries

Previous 1 Next

For Students For Faculty More

Chief Editor :

Dr. Dhanraj Dhangar,
Deptt. of Marathi,
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist. Nashik.[M.S.] India
Email: dhanrajdhangar@gmail.com
Mob. 7775982534

# दलितांच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगतीत दलितेतरांचे योगदान

प्रा. सर्जेराव रणखांब
(मराठी विभाग)
देगलूर महाविद्यालय देगलूर
Email id : sbrankhamb@gmail.com
मो.क्रं.९४२२५३३६६७

दलितांची प्रगती होणे हा प्रयत्न फक्त दलितांचाच असणे इतके महत्वाचे, तितकेच दलितेतरांचे प्रयत्नसुध स्पृश्य-अस्पृश्य यांच्यामध्ये सुसंवाद निर्माण करणारे आहेत. अशा प्रकारचा विचार अधिकाधिक वाढावा ही आजची गरज आहे. अशी आपल्या लेखातून प्रा.रावसाहेब कसबे यांनी भूमिका विशद केली आहे. याच्या मुळाशी जाताना ते म्हणतात 'आजच्या अस्पृश्यतेचे मूळ ज्या पुरोहित वर्गावर्चस्वात आहे, असे माने जाते, त्या पुरोहित वर्गवर्चस्वाला पहिले आव्हान सौम्य रीतीने उपनिषकदर्त्यांनी दिले. बुध्दाने त्या विरोधाचा संघर्ष सार्वत्रिक केला, बुध्दानंतर झालेल्या कठ, केन, छांदोग्य आणि मुंडकासारख्या उपनिषदांनी तर वेदातील कर्मकांडाचा तीव्र निषेध केला. उपनिषदकर्ते क्षत्रिय होते. मी हे यासाठी सांगतो की, हे सर्व प्रयत्न दलितेतरांचे आहेत'.[१] दलितांच्या प्रगतीसाठी अनेक दलितेतरांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रयत्न केलेला आहे यांचा निर्देश, त्यांचे सूक्ष्म विश्लेषण, भूमिका याची उकल कसबेंनी आपल्या लेखातून केली आहे. भारतामध्ये ज्या म्हणून काही परिवर्तनाच्या चळवळी झाल्या त्याच्या दलितांच्या सांस्कृतिक उलथापनाच्या दृष्टीने नकळत का होईना काही फायदे झालेले आहेत, याची कबुली दिलेली आहे. पुढे ते ज्ञानेश्वरांपासून रामदासापर्यंतचे संतमंडळ आणि राजा राम मोहन रॉय, दयानंद सरस्वती आणि न्या.रानडे यांचा उल्लेख करत दलितेतरांच्या प्रयत्नांचे विश्लेषण केले आहे.

रोटीबंदी, भेटीबंदी आणि बेटीबंदी या त्रिसूत्रीच्या माध्यमातून अस्पृश्यांचे शैक्षणिक व सांस्कृतिक उल्थापन रोखण्याचे काम प्रामुख्याने झालेले आहे. या त्रिसूत्रीला हादरा देण्याचे कार्य, अनेक संस्थांनी, व्यक्तीने अगदी पूर्वीपासून केले आहे. त्यात ब्रिटीश सरकार, ख्रिस्ती मिशनरी, ब्राम्हो समाज, आर्य समाज, कर्नल अलकाट, इ.स.१८४८ पासूनचे म.ज्योतिराव फुल्यांचे काम इ.स.१८७०-७० ला प्रार्थना समाजाने अस्पृश्यांसाठी चालविलेल्या शाळा, इ.स.१८९७ साली अस्पृश्यांसाठी मद्रासला शाळा काढणारे के.रंगराव, १८६५ मधील बाबा बॅनर्जीचे कार्य १८८३ मधील सयाजीराव गायकवाडांचे प्रयत्न, १९०६ ते १९०९ मधील सर चंदावरकरांनी केलेले शैक्षणिक कार्य, १९१६ साली मलबारमध्ये टी.के.माधवनला साथ करणारे बेलाय्यन नायर. इ.स.रामस्वामी, १९१७ साली गावणकोटमध्ये मंदिर प्रवेशाची मोहीम हाती घेणरे न्या.सी.रामनपिल्ले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या डिप्रेस्डला मिशनचे दैदिप्यमान कार्य, गोविंदराव मेश्रामना सहकार्य करणारे दादासाहेब पाटील, पंजाबराव देशमुख, इतर ठिकाणचे सत्यशोधक, हे जसे पुरुषांचे कर्तृत्व तसेच दलितेत्तर स्त्रियांनीही या क्षेत्रात काम केले आहे. त्यात १९०८ साली लेडी म्युर मॅकेसी, सौ.चंदावरकर, मिसेस स्टॅनले व सौ.सिताबाई सुखटणकर यांचे प्रयत्न, त्याचप्रमाणे सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई तसेच बाबासाहेबांना शैक्षणिक क्षेत्रात मदत करणारे म.भि.चिटणीस, म.वा.दोंदे सामाजिक क्षेत्रांत मदत करणारे कमलाकांत चित्रे, रा.व.बोले, छत्रपती शाहू, श्री.म.माटे, स्वा.सावरकर, म.गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील, अनंत हरी गद्रे इत्यादी नावे दलितेतरांनी दलितांसाठी केलेर्ल्या कार्याची द्योतक आहेत. असे रावसाहेब कसबे यांनी आपल्या लेखात म्हटले आहे व त्यांचे कार्य तत्कालीन पार्श्वभूमीवर महत्वाचे होते अशी त्यांनी पुष्टी जोडलेली आहे.

नुसत्या नकारांनी समाजपरिवर्तन होत नाही म्हणत कसबे लिहितात, 'हिंदू धर्माला महाराष्ट्रात पहिला विद्रोही नकार म.ज्योतिराव फुल्यांनी दिला. छत्रपती शाहू महाराजांनी तो मर्यादित अर्थांनी सार्वजनिक केला. नवीन धर्म देण्याची फुल्यांची कुवत नव्हती 'सार्वजनिक सत्यधर्म' अनेक बाबतीत अपूर्ण होता. आंबेडकरांनी हिंदू धर्माला बुध्द धर्माचा पर्याय


For Details visit our website – www.uniresearch.net.in

देऊन म.फुल्यांचे काम पूर्ण केले'.[२] १८५२ मध्ये भारताच्या इतिहासातच अस्पृश्यांसाठी पहिली शाळा काढणाऱ्या म.फुल्यांचे काम निःसंशय मोठे होते. असेही म्हटले आहे.

अठराव्या शतकाच्या मध्यामध्ये महाराष्ट्रात सुधारकांची एक पिढी जन्माला आली. परंपरेने चालत आलेल्या रुढी नष्ट करण्यासाठी अनेकांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केलेले आहेत. परंतु त्यांच्या सुधारणेला मर्यादा होती. एक विशिष्ट परंपरेतच राहून त्यांना त्या समाजाची सुधारणा करावयाची होती. असा कयास रावसाहेब कसब्यांनी काढला आहे. परंतु त्यांचे कार्यही त्यांनी तितकेच महत्त्वाचे मानले आहे. 'न्या.रानडे, गोखले, शि.म.परांजपे आणि आगरकरांच्यासह सर्व सुधारक मंडळी ब्राम्हण वर्गाच्या सुधारणेत अडकलेली दिसते. बालविवाह बंदी, विधवा विवाहास प्रोत्साहन, विधवा केशवपन बंदी इ. ब्राम्हणी सुधारणेतच या मंडळींनी स्वतःला अडकवून घेतले होते. यामुळे यासुधारकाग्रीचे विचार बहुजन समाजापर्यंत, तळागाळापर्यंत पोहोचले नाहीत'. या शब्दांत त्यांनी आपले मत नोंदविले आहे.

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे :-**

दलितांच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उत्थानास महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा मोलाचा वाटा आहे. अस्मितादर्श मधून (एप्रिल-मे-जून ७८) महर्षींच्या या कार्यावर रा.ना.चव्हाणंनी एक लेख लिहिला आहे. त्यावरुन त्यांच्या कार्याची प्रचीती येते. दीन, दुबळे यांच्या सर्वांगिण उन्नतीसाठी पद, पैसा, प्रतिष्ठा यांचा काहीही मोह न ठेवता महर्षी शिंदे यांनी अस्पृश्यांसाठी केलेले कार्य अजोड स्वरुपाचे आहे. महाराष्ट्राच्या समाजसुधारकांत त्यांचे स्थान महत्वपूर्ण आहे. अस्पृश्य आणि स्पृश्य असे दोन्ही वर्ग एकमेकांत अगदी मिसळून जावेत या प्रेरणेने त्यांनी आयुष्यभर कार्य केले व यासाठीच त्यांनी आयुष्यभर एकात्मतेचा ध्यास घेतला होता.

'अस्पृश्योध्दार करताना कोणताही अहंकार न बाळगता अस्पृश्यता निर्मूलन म्हणजे स्पृश्यांनी स्वतःची स्वतः करुन घेतलेली शुध्दी होय. म.गांधीच्या अगोदर अस्पृश्यतेचा 'कलंक' धुऊन काढण्याचा हा फार मोठा प्रयत्न होता'.[३] या शब्दांत शिंदे यांच्या कार्याचे द्रष्टेपण लक्षात येते. 'डिप्रेस्ड क्लास मिशन' ने सत्तर शैक्षणिक संस्था व अनेक भागात त्यांच्या शाखा उघडून आपले कार्य सुरु ठेवले. 'डेक्कन आदी हिंदू सोशल क्लब' आदि हिंदू नियतकालिक, 'अस्पृश्यता निवारक परिषद' यांच्या कचेऱ्या पुण्यात अहिल्याश्रमात त्यांनी सुरु केल्या. त्यांनी स्थापन केलेल्या संस्थातून अनेक अस्पृश्यांनी शिक्षण घेण्यास सुरुवात केली. 'त्याच्या देखत सन १९०६ नंतर एक पिढी शिकली. श्री मारुतीराव जाधव हे पहिले अस्पृश्यांमधून बी.ए.झाले व ते प्रारंभी मिशनच्या इंग्रजी शाळेत मुलांना शिकवण्याचे कार्य सुरु केले.या प्रकारे महर्षी शिंदे यांनी दलितांना त्यांच्या पायावर उभे राहण्यास हळुहळू शिकविले'.[४]

पुण्याच्या शाखेतच शिंदे सहकुटूंब राहत होते. दलितांच्या सांस्कृतिक प्रगतीसाठी प्रार्थना, संगीतसभा, गीतावर्ग वगैरे अध्यात्मिक कार्यही त्यांनी सुरु ठेवले. 'दलित' शब्दासाठी 'Depressed' हा इंग्रजी शब्दाचा पर्याय शिंद्यानीच प्रथम वापरात आणलेला आहे. दलितांच्या उन्नतीसाठी त्यांना भाकरी तर पाहिजेच, पण त्याबरोबर धर्मदेखील हवा, असे महर्षी शिंदे यांचे मत आहे. असे रा.ना.चव्हाणांनी आपल्या लेखातून त्यांच्या सांस्कृतिक कार्याची ओळख करुन दिली आहे.

अस्पृश्यता निवारक परिषदांची अनेक मोठमोठी अधिवेशने भारताच्या अनेक भागात त्यांनी घडवून आणली. कॉंग्रेसच्या अधिवेशनास शिंदे नेहमी उपस्थित राहत असत. इंग्रज सरकारने बंद केलेल्या महारपलटणी पुन्हा सुरु करण्यासाठी महर्षींनी प्रयत्न केलेले आहेत.

१९१८ पासून 'अ.भा.अस्पृश्यताविरोधी लीग' नामक संघटना चालू करुन सयाजीराव गायकवाडांच्या अध्यक्षतेखाली शिंद्यांनी अधिवेशन भरविले. सार्वजनिक स्थळे, पाणवठे, कचेऱ्या, शाळा स्मशाने वगैरे दलितांना संपूर्ण मोकळे असावेत यासाठी ठराव मंजूर करुन घेतला. शिंद्याच्या प्रयत्नामुळे स्कॉलरशिप, कौन्सीलात राखीव जागादेखील

मिळाल्या. असे रा.ना.चव्हाणांनी आपल्या लेखातून त्यांच्या कार्याची यादी दिली आहे. पुढे ते म्हणतात, '१९०५-०६ सालापासून दलितांच्या प्रश्नावर देखील भारतात जागृती करण्याचे कार्य महर्षी शिंदे यांना सातत्याने प्रथम करावे लागले. सन १९१७ साली राष्ट्रीय सभेचे अधिवेषन ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली या अधिवेशनात शिंद्यांच्या प्रयत्नाने प्रथम अस्पृश्यताविरोधी ठराव पास करून घेण्यात यश मिळविले'. स्वराज्य येण्याच्या अगोदर दलितांचा प्रश्नही किती महत्वाचा होता.

अस्पृश्यतेच्या संदर्भात म.फुलेंचे कार्य बीज भूत स्वरुपाचे होते, पण शिंदे यांनी कार्यात आपले सारे जीवन समर्पून डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या कार्याला विस्तृत पाया तयार केला. महर्षी शिंदे मध्यंतरी महत्वाचे ठरतात. असा अभिप्राय लेखाच्या उपसंहारातून व्यक्त झाला आहे. आखिल भारतातील प्रत्येक प्रांतात प्रवास करून ह्या बष्हिकृत भारतासंबंधी त्याची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक माहिती त्यांनी जमविली, विविध जाती-जमातींचा इतिहास त्यांनी शोधून काढला. भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न हे त्यांचे संशोधनीय पुस्तक त्यांच्या विद्वत्तेची साक्ष देणारेच आहेत. अशा प्रकारचा महर्षी शिंदेच्या कार्याविषयीचा आलेख या लेखातून विचारवंत रा.ना.चव्हाण यांनी दिला आहे. सयाजीराव गायकवाड, छत्रपती शाहू महाराज यांच्याप्रमाणे कोणतीही यंत्रणा आपल्या हाताशी नसताना महर्षींनी केलेले कार्य हजार पटीने कसे श्रेष्ठ आहे, याचा उल्लेख रावसाहेब कसबेंनीही केला आहे. (अस्मितादर्श शिक्षण-संस्कृती विशेषांक १९७५, पृ.१५५) 'महाराष्ट्राच्या समाजसुधारकात महर्षी शिंदे यांचे स्थान महत्वपूर्ण आहे. सामाजिक उत्थानासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. जीर्ण पारंपरिक प्रवृत्तींशी त्यांना सतत झुंज द्यावी लागली. महर्षी शिंदे हा झुंजणारा आत्मा होता. त्यांच्या जीवनात ज्ञाननिष्ठा, त्याग, तपस्या आणि उत्कट स्वरुपाची सामाजिक जाणीव यांचा संगम झालेला आहे'.[५] या विधानावरुन महाराष्ट्रात दलितांच्या उन्नतीसाठी त्यांनी आपली काया कशी झिजवली याचा प्रत्यय येतो. तरीही महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाच्या इतिहासात त्यांना उपेक्षितच राहावे लागले आहे, अशी खंत प्रा.एन.डी.पाटील यांनी आपल्या छोटीखानी पुस्तकात व्यक्त केली आहे. ती खंत यथार्थ वाटते.

**छत्रपती शाहू महाराज :-**

१७ मार्च १८८४ रोजी शाहू महाराज कोल्हापूर राज्याची अधिकारसूत्रे त्यांनी हातात घेतली. त्यावेळच्या परिस्थितीचे स्वरुप लक्षात घेता फक्त एकाच सुशिक्षित जातीचे वर्चस्व होते. मागासलेल्या जातींना कुठेही नोकऱ्या नव्हत्या. या परिस्थितीवर मात करण्यासाठी बहुजनांच्या हितासाठी शाहू महाराजांनी खास शिष्यवृत्त्या व विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची सुविधा प्राप्त करुन दिली. एकाच जातीच्या हाती राजसूत्रे ठेवणे महाराजांना न्यायाचे वाटत नव्हते.

भारतासारख्या नानाविध जाती धर्माच्या देशात समाजातील विविध गटात विकासाचा समतोलपणा नव्हता. 'पुढारलेल्या घटकांपेक्षा दुबळ्या घटकाकडे जास्त मदतीचा हात देणे हे त्यामुळे आदर्श शासकाचे वा शासनसंस्थेचे प्रमुख कार्य व्हावे लागते. शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य याच अनुषंगाने बांधले आणि वाढविले, अशा छत्रपतींच्या गादीवर विराजमान होणाऱ्या शाहू महाराजांच्या आशा-आकांक्षेला तथा शासकीय धोरणाला एका निश्चित आदर्शाची वाटचाल करावयाची होती'.[६] परंतु तत्कालीन ब्राम्हण मंडळींना हे गैरसोयीचे होते. परंतु आपल्या प्रजेतील पुढारलेल्या लोकांपेक्षा मागासलेल्या लोकांची काळजी वाहणे हेच धोरण महाराजांनी नजरेसमोर ठेवले.

या धोरणातूनच कोल्हापूरात मराठा, लिंगायत, जैन, मुसलमान, अस्पृश्य अशी वसतिगृहे निघाली. तसेच सर्व जातीच्या विकासातून सामंजस्य व ऐक्य वाढीला लागावे म्हणून ब्राम्हण जातीलासुध्दा महाराजांनी दूर ठेवले नाही. त्यांच्यासाठी दैवज्ञ, ब्राम्हण, सारस्वत ब्राम्हण, अशी वसतिगृहे सुरु केली.

जीवनकलहात कोणताही समाज शिक्षणसंपन्न असल्याशिवाय तग धरु शकत नाही हे महाराजांनी ओळखले होते. या जाणिवेतूनच 'महाराजांनी शिक्षण-संस्थांची वाढ व्हावी यासाठी आपल्या राज्यात आणि राज्याबाहेरील पुणे, अहमदनगर, नाशिक, नागपूर आदी ठिकाणच्या शैक्षणिक संस्थांना शिक्षणकार्याची वृध्दी व्हावी म्हणून अगदी सढळ

ISSN 2321-4953 (Online)
December - 2017

हातानो सहाय्य केले'.[७] देशातील सर्वच नागरिक सुशिक्षित सुसंपन्न व समर्थ व्हावे, सर्वांच्यामध्ये ऐक्याची बुध्दी होऊन राष्ट्राचा कारभार व्यवस्थित चालावा. समाजातील कोणताही घटक दुबळा राहू नये अशी त्यांची मनिषा होती. ती तळमळ अस्मितादर्शमधील लेखातून व्यक्त झाली आहे.

म.रा.नलावडे आपल्या लेखात शाहू महाराजांविषयी लिहितात 'जनतेला शिक्षण देणे हा राजाचा कर्तव्याचा एक भागच आहे, परंतु भारतातल्या लोकांचे दुर्दैव असे की, ज्या राजाच्या संरक्षणासाठी लोक रक्त सांडत असत त्या राजांनी आपल्या जनतेला शिक्षण देऊन शहाणे करण्याचा प्रयत्न केव्हाच केला नाही. महाराष्ट्रात हा बहुमान शाहू महाराजांच्यामुळेच कोल्हापूर संस्थानला प्राप्त झाला होता'.[८]

प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केल्याशिवाय भागणार नाही हे ओळखून महाराजांनी १९१२ सालीच आपल्या राज्यात तसा कायदा करुन वतनदारी शिक्षक नेमण्याची प्रथा सुरु केली. बहुजन समाजाच्या शिक्षणाच्या बाबतीतला दर्जा वाढून वरिष्ठ वर्गाच्या बरोबरीचे अंशतः तरी तो झाल्याशिवाय सुधारणेच्या दिशेने माझ्या संस्थानाच्या राज्यकारभारात लोकांत हक्क देण्यास मी धजणार नाही. ही त्याची विचारसरणी होती.

**संदर्भ :**

१. चव्हाण रा.ना.अस्मितादर्श-(एप्रिल-मे-जून७८) (अंक २) पृ..११
२. चव्हाण रा.ना.अस्मितादर्श-(एप्रिल-मे-जून७८) (अंक २) पृ..१२
३. दहातोंडे भिकाजी - म.रा.वि.शिंदे व्यक्ति आणि विचार (मनोगत) पृ.५
४. नलावडे म.दा.-अस्मितादर्श-(शिक्षण व संस्कृती विशेषांक १९७५) पृ.४४
५. नलावडे म.दा.-अस्मितादर्श-(शिक्षण व संस्कृती विशेषांक १९७५) पृ.४५
६. खैरनार म.दा.-अस्मितादर्श-भारतीय संस्कृतीतील लोकभ्रम (अस्मितादर्श दिवाळी) ७३ पृ.१०
७. खैरनार म.दा.-अस्मितादर्श-भारतीय संस्कृतीतील लोकभ्रम (अस्मितादर्श दिवाळी) ७३ पृ.१०
८. खैरनार म.दा.-अस्मितादर्श-भारतीय संस्कृतीतील लोकभ्रम (अस्मितादर्श दिवाळी) ७३ पृ.१०
९. खैरनार म.दा.-अस्मितादर्श-भारतीय संस्कृतीतील लोकभ्रम (अस्मितादर्श दिवाळी) ७३ पृ.१०